
लोकसत्ता

# वसंत डहाके, दिशा शेख यांना काळसेकर काव्य पुरस्कार जाहीर

लोकसत्ता प्रतिनिधी


वसंत डहाके


दिशा शेख

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२२ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवी, साहित्यिक वसंत आबाजी डहाके ( अमरावती ) यांना, तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' दिशा पिंकी शेख ( श्रीरामपूर ) यांना जाहीर करण्यात आला आहे. येत्या ५ ऑगस्ट रोजी पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात येणार आहे.

कवी सतीश काळसेकर व ऋत्विज काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणाऱ्या या पुरस्कारांचे स्वरूप अनुक्रमे रुपये २१ हजार व १० हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे आहे.

काळसेकर यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीतून विद्यापीठातर्फे काव्यक्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवीस दरवर्षी 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार', तर नव्या पिढीतील कवीस 'ऋत्विज काळसेकर पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येत आहे.

जनसंपर्क कक्ष
23 JUL 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या शैक्षणिक धोरणात मनुष्यबळ व्यवस्थापकांचे योगदान महत्त्वाचे

## - डॉ. ए. एम. गुरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिक्षण व्यवस्थेत येत असलेल्या नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देणे गरजेचे आहे. सर्वांच्या योगदानातून या धोरणानुसार होणारे बदल आत्मसात करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत उद्योग क्षेत्रातील मानव संसाधन व्यवस्थापकांनी सहभागी होऊन नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी सकारात्मक भूमिका बजावावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे कोल्हापूरसह सातारा व सांगली जिल्ह्यांतील उद्योजक व मानव संसाधन व्यवस्थापक यांच्यासाठी 'नवीन शैक्षणिक धोरण २०२० : उद्योजक व मानव संसाधन व्यवस्थापक यांची भूमिका' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. गुरव बोलत होते.

डॉ. गुरव म्हणाले, येत्या शैक्षणिक वर्षापासून नव्या शैक्षणिक धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शिवाजी विद्यापीठ तयार असून, धोरणानुरूप होणारे बदल लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना अधिकाधिक सक्षम व उद्योगक्षम बनवण्यासाठी प्रयत्नशील आहे. नवीन शैक्षणिक धोरणात समाजातील अनेक घटकांचा समावेश असून, विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांना वाव मिळणार आहे. हेच विद्यार्थी उद्या देशसेवा करणार आहेत. ही सेवा देशाला प्रगतिपथावर नेणारी ठरावी, यासाठी शिक्षण व्यवस्थेत उद्योग क्षेत्राने मार्गदर्शकाची भूमिका चांगल्या प्रकारे निभावणे गरजेचे आहे.यावेळी संघसेन जगतकर यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी संजय बेनके, अनंत पाटील यांच्यासह कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यांतील मानव संसाधन व्यवस्थापक उपस्थित होते. महेश चव्हाण यांनी आभार मानले.

23 JUL 2022 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पेपर तपासणी होणार ऑनस्क्रीन

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत होणाऱ्या परीक्षांची भविष्यात पेपर तपासणी ऑनस्क्रीन होणार आहे. प्रश्नपत्रिकेपासून ते निकालपत्रकापर्यंत सर्व परीक्षेची कामे ऑनलाईन होणार आहेत. एखाद्या महाविद्यालयाला प्रश्नपत्रिका पाठवल्यानंतर विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त प्रश्नपत्रिकेच्या प्रती काढल्या तर त्याचे कारण महाविद्यालयाने विद्यापीठाला देणे बंधनकारक राहणार आहे. परिणामी, प्रश्नपत्रिका फुटण्याचे प्रकार थांबणार आहेत. पेपर तपासणी, मॉडरेशनही ऑनस्क्रीन होणार असल्याने निकालातही जास्त पारदर्शकता येणार आहे. त्यामुळे पेपर तपासणी ऑनस्क्रीन करण्याचा संकल्प विद्यापीठातील परीक्षा विभागाने केला आहे.

विद्यापीठातील विद्यापरिषदेच्या मार्गदर्शनाखाली भविष्यात क्वेशन बँक तयार केली जाणार आहे. पेपर सेटरने विद्यापीठात येऊन क्वेशन बँकेतूनच ऑनलाईन प्रश्नपत्रिका तयार करायची आहे. प्रश्नपत्रिका केल्यानंतर ती कॉपी करून घेण्याचा ऑप्शन पेपरसेटरशिवाय अन्य कोणालाही मिळणार नाही. त्यामुळे पेपरफुटी किंवा एखाद्याला जादाचे गुण देण्याचे प्रकार थांबणार आहेत. एसआरपीडीच्या माध्यमातून पाठवलेल्या प्रश्नपत्रिकेच्या प्रती विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त काढण्याची परवानगी महाविद्यालयाला राहणार नाही. जादाची एखादी प्रिंट काढलीच तर त्याचे कारण महाविद्यालय प्रशासनाला विद्यापीठाला द्यावे लागणार आहे.

सर्व पेपर आणि महाविद्यालयाला वेगवेगळा बारकोड दिला जाणार आहे. त्यामुळे पेपरचे स्कॅनिंग झाले की तो कोणत्या विषयाचा, कॉलेजचा आहे, हे समजणार आहे. पेपर तपासणीसह निकाल जाहीर करण्याचे काम सोपे होणार आहे. विद्यापीठाचा परीक्षेवर खर्च होणारा पैसा, मनुष्यबळ आणि श्रमही कमी होणार आहेत. तंत्रज्ञान विकसित केल्यावर सुरूवातीला काही महाविद्यालयांना याचा त्रास होणार असला तरी सिस्टीम सेटअप झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने सर्वच परीक्षांच्या पेपर तपासणीची कामे ऑनस्क्रीन होणार आहेत. विद्यापीठाने ऑफलाईन दीर्घोत्तरी परीक्षेचा निर्णय घेतला, त्याची तयारीही केली होती. परंतु विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे ऑफलाईन पण वस्तुनिष्ठ पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय विद्या परिषदेने जाहीर केला. त्यामुळे पुन्हा नव्याने परीक्षेच्या तयारीसाठी तारेवरची कसरत करावी लागली. परीक्षा विभाग आणि प्रिंटींग प्रेसच्या कर्मचाऱ्यांना तब्बल बारा तास काम करावे लागले. ओएमआर शीटच्या छपाईचे काम युद्ध पातळीवर पूर्ण करून, परीक्षाही सुरू झाली. आता विद्यापीठातील चार मशिनवर कॉलेजनिहाय पेपर स्कॅनिंग करून, वेळेत निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यातून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची शिक्षण, नोकरीचा मार्ग सुकर होणार आहे.

### भविष्यात परीक्षेची सर्व कामे ऑनस्क्रीन होणार

प्रत्येक महाविद्यालयांना एसआरपीडीच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका पाठवल्या. उत्तरपत्रिका संकलनासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात चार संकलन केंद्राची निर्मिती केली. उत्तरपत्रिकाही त्याच संकलन केंद्रांवरून संकलित केल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून पहिल्यांदा पदवी व पदव्युत्तर अंतिम वर्षाचे निकाल जाहीर करण्यास प्राधान्य दिले आहे. परीक्षा झाल्यानंतर फक्त पंधरा दिवसात निकाल जाहीर करण्याचा निर्धार आहे. भविष्यात परीक्षेची सर्व कामे ऑनस्क्रीन होणार आहेत.

**डॉ. ए. एन. जाधव, (संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ)**

**तरुण भारत विशेष वृत्त**



- **परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी परीक्षा विभागाचा संकल्प**
- **वस्तुनिष्ठ ऑफलाईन परीक्षेचे पेपर स्कॅनिंग करून तपासणार**
- **विद्यार्थी हितासाठी पंधरा दिवसांमध्ये निकाल जाहीर करणार**

तरूण भारत

# नॅनोटेक्नॉलॉजी करिअर संधीबाबत ऑनलाईन व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी' या अधिविभागातर्फे येत्या २७ जुलैपासून 'नॅनोसायन्स आणि नॅनोटेक्नॉलॉजी क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानमालिकेचे आयोजन जाणार आहे. ३० जुलैपर्यंत रोज दुपारी १२ ते १ यावेळेत व्याख्यानमाला सुरु राहिल. यामध्ये विविध तज्ज्ञ मंडळीकडून करिअरच्या संधींची माहिती सांगण्यात येणार आहे. या व्याख्यानमालेत प्रामुख्याने बारावी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांना सहभागी होता येईल. त्यासाठी https://meet.google.com/eco-gfyn-dps अशी लिंक तयार केली आहे. तिच्या माध्यमातून इच्छुकांनी व्याख्यानमालेत सहभागी व्हावे, असे आवाहन अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.